R.No.MAHMAR/ 25/ A3029

लातूर

वर्ष: ६ वे, अंक नं.: १

दि. २ डिसेंबर २०२५, वार: मंगळवार

पानेः ४, किंमतः स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

# महावृत्त

R.No.MAHMAR/25/A3029

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

## निवडणूक आयोग गोंधळलेले; थोरातांचा निशाणा



मुंबई : मतदानाच्या केवळ एक दिवस आधीच पुढे निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे २४ नगराध्यक्ष आणि २०४ नगरपालिका सदस्यांची निवडणूक लांबणीवर गेल्या आहेत. त्यामुळे उमेदवार आणि मतदारांमध्ये मोठी निराशा पसरली आहे. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक सत्ताधारी नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर विरोधकांनीदेखील निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे. माज्या राजकीय जीवनात इतका गोंधळलेला निवडणूक आयोग मी कधीही पाहिलेला नाही, अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, आधीचे निवडणूक आयोग स्वायत्तपणे काम करत असे. पण, आता आयोग सरकारच्या दिशेनुसार निर्णय घेत असल्याचे चित्र आहे. निवडणुका एक दिवस आधी पुढे ढकलणे, काही ठिकाणी प्रक्रिया थांबवणे, तर काही ठिकाणी जुन्या याद्यांवरून मतदानाची तयारी ठेवणे, या कृतींमुळे लोकांचा आयोगावरचा विश्वास ढासळत चालला आहे असा टोला त्यांनी यावेळी लगावला.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेला कार्यक्रम चुकीचा, विस्कळीत आणि संशयास्पद आहे. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाबाबत दिलेल्या स्पष्ट निदेर्शांकडे आयोग दुर्लक्ष कसे करू शकतो? निवडणुका अचानक रद्द करणे किंवा पुढे ढकलणे याचा गंभीर परिणाम जनतेवर होतो. याचा विचार आयोग करत नाही. अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

निवडणूक आयोग स्वतः निर्णय घेणार की मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सांगतील तसे वेळापत्रक जाहीर करणार? प्रत्येक वेळी सत्ताधा-याच्या इशा-यावर कार्यक्रम बदलला जाणार असेल तर आयोगाचे अस्तित्वच शंकेखाली येते, असा सवाल बाळासाहेब थोरात यांनी उपस्थित केला आहे.

निवडणुकांआधीच मतदार याद्यांमधील घोळ, काही ठिकाणी चुकीचे प्रभाग वर्गीकरण, काही भागात हजारो मतदार एका वॉडार्तून दुस-यात टाकणे, अशा सर्व विसंगती आयोगाच्या नियोजनशक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. लोकशाहीतील सर्वात महत्त्वाची प्रक्रिया म्हणजे मतदान तसेच त्यातच गैरव्यवहार दिसला तर भविष्यात जनतेचा लोकशाहीवरचा विश्वास डळमळीत होऊ शकतो अशी चिंता व्यक्त केली आहे.

काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय जनतेच्या हक्कावर गदा आणणारा आहे. लोकांनी उमेदवारांवर विश्वास ठेवून त्यांना साथ दिली. प्रचारामध्ये सर्व शक्ती खर्च केल्या, पण मतदानाच्या आदल्या दिवशी निवडणूक रद्द केली. तर उमेदवारांचे आणि मतदारांचे काय? जनतेचे मत व्यक्त करण्याचा अधिकार हिरावणे म्हणजे लोकशाहीला धक्का,ह्लह्ल असे म्हणत त्यांनी टीका केली. ह्यचुकीची वेळापत्रक आखून नंतर चुका जनतेच्या माथी मारणे हे अत्यंत गैरकृत्य आहे. तसेच जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

## माझ्यावर भ्रष्टाचाराचे आरोप; पाच पैशांचा मिंधा नाही



पुणे : माज्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले, मात्र मी कोणाचा पाच पैशांचा मिंधा नाही. समोर बसलेल्या लोकांनी सांगावं की कुठलंही काम करण्यासाठी अजित पवारांनी कधी पैसे घेतले का? असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. पुण्यातील एका प्रचारसभेत ते बोलत होते. उपमुख्यमंत्री यावेळी म्हणाले, सत्तेत असल्यास आपल्या मतदारसंघाचा, भागाचा, जिल्ह्याचा विकास करता येतो. अजित पवार म्हणाले, माज्यावर भ्रष्टाचाराचे, ७० हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचे आरोप केले गेले. मात्र, मी कोणाचा पाच पैशांचा मिंधा नाही. आज इथे दिलीप मोहिते पाटील बसले आहेत, कैलास, किरण, अरुण आणि आपले इतर अनेक सहकारी बसले आहेत. लाडक्या बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. इतक्या वर्षांपासून मी राजकारणात आहे, सामाजिक जीवनात काम करतो.

इथल्या एका माणसाने उठून सांगावे की अजित पवारांनी एखादे काम करत असताना कायतरी चिरीमीरी घेतली किंवा एखाद्या कामासाठी चिरीमिरी द्यावी लागली आणि मग आमचं काम झाले. उलट माज्या कामाच्या बाबतीत सगळे अधिकारी टरकून राहतात. त्यांना भिती असते की याला समजले तर काही खरं नाही.

तत्पूर्वी अजित पवार यांनी माळेगाव नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजपा पुरस्कृत जनमत विकास आघाडीच्या वतीनं आयोजित माळेगावमधील प्रचाराच्या सांगता सभेत उपस्थितांना संबोधित केलं.

## शस्त्र निर्मिती उद्योगात भारत जगाच्या शर्यतीत

### टॉप-१०० शस्त्र निर्मिती कंपन्यांच्या यादीत ३ भारतीय कंपन्यांची एन्ट्री मेक इन इंडियाचा प्रभाव




नवी दिल्ली : भारताच्या स्वदेशी संरक्षण उत्पादन क्षमतेला जागतिक मान्यता मिळाली असून ह्यमेक इन इंडियाह्ल आणि ह्यआत्मनिर्भर भारतह्ल अभियाना अंतर्गत देशाने मोठी झेप घेतली असून, स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट (एसआयपीआरआय) ने सोमवार दि. १ डिसेंबर रोजी जाहीर केलेल्या अहवालात जगातील टॉप-१०० शस्त्र निर्मिती कंपन्यांमध्ये भारतातील तीन कंपन्यांचा समावेश झाला आहे.

ही यादी भारताच्या संरक्षण उद्योगातील वाढत्या क्षमता आणि स्वदेशीकरणाच्या प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित करते. एसआयपीआरआयचा ह्यटॉप १०० शस्त्रास्त्र उत्पादक आणि लष्करी सेवा कंपन्या, २०२४ह्ल रिपोर्ट दर्शवतो की, २०२४ मध्ये जगातील टॉप-१०० संरक्षण कंपन्यांचा एकत्रित महसूल ६७९ अब्ज डॉलर या विक्रमी पातळीवर पोहोचला. तर, अमेरिकेतील तीन प्रमुख कंपन्या लॉकहीड मार्टिन, नॉर्थरोप ग्रुमन आणि जनरल डायनॅमिक्स यांचा एकत्रित महसूल २०२४ मध्ये ३.८% वाढून ३३४ अब्ज डॉलर झाला.

एसआयपीआरआयच्या अहवालानुसार जगातील सर्वोच्च पाच शस्त्र उत्पादक कंपन्यांमध्ये चार अमेरिकन कंपन्या आहेत. लॉकहीड मार्टिन, आरटीएक्स, नॉर्थरोप ग्रुमन आणि जनरल डायनॅमिक्स अशा आहेत. याशिवाय, ब्रिटनची बीएई सिस्टिम्स कंपनी चौथ्या स्थानावर आहे, ज्यामुळे टॉप-५ मध्ये एकमेव गैर-अमेरिकी कंपनी म्हणून तिची नोंद होते.

**कोणत्या भारतीय कंपन्यांना जागतिक मान्यता?**

१) हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) ४४ वा क्रमांक (एलसीए तेजस फायटर जेटचे उत्पादन)

२) भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल) ५८वा क्रमांक (रडार आणि इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर सिस्टीम)

३) माझगाव डॉकयार्ड लिमिटेड (एमडीएल) ९१ वा क्रमांक (युद्धनौका आणि पाणबुडी निर्मिती)

टॉप-१०० यादीत अमेरिकेच्या ३९ कंपन्या आहेत. यापैकी ३० कंपन्यांच्या महसुलात वाढ नोंदली गेली आहे.

# लातूर जिल्ह्यातील तीन नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज मतदान

### निलंगा नगरपरिषद, रेणापूर नगरपंचायत, उदगीर नगरपरिषदेच्या तीन जागांची निवडणूक प्रक्रिया सुधारित कार्यक्रमानुसार




लातूरः जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर व औसा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवार, ०२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या कालावधीत मतदान होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या २९ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या पत्रानुसार निलंगा नगरपरिषद व रेणापूर नगरपंचायतीच्या सर्व जागांचे मतदान, तसेच उदगीर शहरातील तीन जागांचे मतदान पुढे ढकलण्यात आले असून ते सुधारित कार्यक्रमानुसार होणार आहे.

उदगीर नगरपरिषदेमध्ये २० प्रभागांमध्ये ९१ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. यासाठी एकूण ११० मतदान पथके आणि १४ झोनल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच १२१ कंट्रोल युनिट आणि २४२ बॅलेट युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या नगरपरिषदेत ८३ हजार १७९ मतदार आपला हक्क बजाविणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार प्रभाग क्रमांक ८ अ, प्रभाग क्रमांक १५ ब आणि प्रभाग क्रमांक १६ ब या तीन सदस्यपदाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे ३७ सदस्य आणि नगराध्यक्ष पदासाठी मतदान होणार आहे.

अहमदपूर नगरपरिषदेमध्ये ४४ मतदान केंद्रांवर मतदान घेतले जाणार असून यासाठी ४९ मतदान पथके आणि ८ झोनल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १२ प्रभागांमधील २५ सदस्य आणि नगराध्यक्ष पदासाठी ही निवडणूक होणार आहे. ३७ हजार ६९६ मतदार यामध्ये आपला हक्क बजावतील. यासाठी ६१ कंट्रोल युनिट आणि १२२ बॅलेट युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत.औसा नगरपरिषदेमध्ये ११ प्रभागातील २३ सदस्य आणि नगराध्यक्षपदासाठी मतदान होत आहे. यासाठी ५१ कंट्रोल युनिट आणि १०२ बॅलेट युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत, तसेच ५० मतदान पथके आणि ५ झोनल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याठिकाणी ३२ हजार ३२० मतदार मतदानाचा अधिकार बजाविणार आहेत.

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारसंघात सार्वजनिक सुट्टी जाहीरः** नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदानासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारसंघात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार अहमदपूर, औसा व उदगीर या मतदारसंघात ही सार्वजनिक सुट्टी लागू राहणार आहे. तसेच या मतदारसंघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी त्या त्या मतदार संघाच्या बाहेर असतील त्यांनाही सुट्टी लागू राहील. नगरपरिषद क्षेत्रातील शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका इत्यादींना ही सार्वजनिक सुट्टी लागू राहणार आहे.

**तिन्ही नगरपरिषद क्षेत्रातील मद्यविक्री राहणार बंदः** उदगीर, अहमदपूर, आणि औसा या तीन नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २ डिसेंबर,२०२५ रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे मतदानादिवशी या तिन्ही नगरपरिषद हद्दीतील सर्व प्रकारची मद्यविक्री बंद राहील. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर -घुगे यांनी महाराष्ट्र मद्य निषेध कायदा, १९४९ व महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री, मद्यविक्री नोंदवही इ.) नियम १९६९ च्या संबंधित कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

## युगेंद्र पवारांच्या लग्नात सुप्रिया सुळेंचा भन्नाट डान्स



बारामती : सध्या पवार कुटुंबात लगीनघाई सुरू आहे. युगेंद्र पवार यांच्या वरातीत आत्याबाई सुप्रिया सुळे यांनी जोरदार डान्स केला. इतकेच नव्हे तर त्यांनी फुगडीदेखील खेळली. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांचा विवाहसोहळा ३० नोव्हेंबर रोजी मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील जिओ सेंटरमध्ये थाटामाटात पार पडला. युगेंद्र यांनी तनिष्का कुलकणीर्शी लग्नगाठ बांधली. या लग्नसोहळ्याला उपमुख्यमंत्री अजित पवार वगळता संपूर्ण पवार कुटुंबीयांनी हजेरी लावली होती. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवारसुद्धा तिथे उपस्थित होत्या. युगेंद्र पवार यांची वरात अत्यंत धूमधडाक्यात आली होती. यावेळी युगेंद्र पवारांच्या आत्या सुप्रिया सुळे यांनी जबरदस्त ठेका धरला होता. त्यांच्या डान्सचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत.

युगेंद्र पवार यांच्या लग्नात सुप्रिया सुळे अत्यंत आनंदी दिसल्या. त्यांनी स्वतः ठेका धरलाच, शिवाय इतरांनाही नाचण्याचा आग्रह केला. यावेळी त्यांनी फुगडीदेखील खेळली. युगेंद्र पवार हे शरद पवार यांचे नातू आणि त्यांचे मोठे बंधू श्रीनिवास पवार यांचे चिरंजीव आहेत. त्यांची पत्नी तनिष्का कुलकर्णी या मूळच्या मुंबईच्या आहेत. त्यांच्या कुटुंबाची व्यावसायिक पार्श्वभूमी आहे. घरात कौटुंबिक कार्यक्रम असला की पवार कुटुंबीय आपले राजकीय मतभेद विसरून एकत्र येताना दिसतात. अजित पवार यांनी बंड करून वेगळी चूल मांडल्यानंतरदेखील अनेकवेळा अजित पवार, शरद पवार कौटुंबिक तसंच राजकीय कार्यक्रमात एकत्र दिसलेले आहेत.

## तुम्ही चर्चा करत नाही, तो ड्रामा; हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी प्रियंका गांधींचा मोदींवर निशाणा



नवी दिल्ली : संसदेच्या हिवाळी अधिवेशनाची सुरुवात अपेक्षेप्रमाणेच वादळी झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सोमवारी लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधी पक्षांनी जोरदार गदारोळ केला. लोकसभेचे कामकाज शून्य प्रहरात सुरू होताच, एसआयआर आणि प्रदूषण यांसारख्या तातडीच्या आणि महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्याच्या मागणीवरून विरोधकांनी प्रचंड गोंधळ सुरू केला.

लोकसभा अध्यक्षांनी शांतता राखण्याचे आवाहन करूनही गदारोळ थांबला नाही, त्यामुळे अखेर कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना उद्देशून मोठे विधान केले होते. ते म्हणाले होते की, संसदेत ह्यड्रामा नाही, डिलिव्हरीह्ल झाली पाहिजे. यावर काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी वाड्रा यांनी जोरदार प्रतिक्रिया देत पलटवार केला.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना सकारात्मक राजकारण करण्याचा सल्ला दिला. विरोधकांनी त्यांच्या पराभूत मानसिकतेवर मात करावी. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाची सुरुवात एसआयआर आणि वायू प्रदूषण या दोन महत्त्वाच्या मुद्यांवरून झाली आहे समाजवादी पक्षाचे खासदार रामगोपाल यादव आणि काँग्रेसचे प्रमोद तिवारी यांनी एसआयआर हा सर्वात मोठा मुद्दा असून त्यावर चर्चा न झाल्यास कामकाज चालू देणार नाही अशी भूमिका घेतली आहे. प्रियंका गांधी यांनी ट्वीट करून दिल्लीतील प्रदूषणाच्या लाजिरवाण्या परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारांनी तात्काळ कठोर पाऊले उचलण्याची मागणी केली आहे, कारण प्रदूषणाने लहान मुलांच्या फुफ्फुसांचे मोठे नुकसान केले आहे.

संसद हे महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्यांवर चर्चा करण्याचे ठिकाण आहे आणि नाटके करण्यासाठी इतरही ठिकाणे आहेत. त्यावर वायनाडमधील काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी तीव्र शब्दांत टीका केली. निवडणुकीची परिस्थिती, एसआयआर आणि प्रदूषण हे खूप मोठे मुद्दे आहेत, त्यावर चर्चा झालीच पाहिजे. संसद कशासाठी आहे? मुद्यांवर बोलणे आणि ते उपस्थित करणे हा ड्रामा नाही. चर्चा होऊ न देणे, हा खरा ड्रामा आहे अशा शब्दांत त्यांनी पंतप्रधानांच्या विधानाला उत्तर दिले.पंतप्रधान मोदींनी सर्व पक्षांना, विशेषतः विरोधी पक्षांना अधिवेशन सुरळीत आणि सन्मानजनकपणे चालवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. त्यांनी स्पष्ट केले की, ड्रामा करण्यासाठी संसदेबाहेर अनेक जागा आहेत, पण सभागृहात गोंधळाला जागा नाही. यावर काँग्रेसने पंतप्रधान मोदींवर ढोंगीपणाकरत असल्याचा आरोप केला. पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी पंतप्रधान स्वतः कधी संसदेत उपस्थित नसतात किंवा विरोधकांशी संवाद साधत नाहीत. संसद सुरळीत न चालल्यास संपूर्ण दोष पंतप्रधानांचा आहे, कारण ते अत्यावश्यक सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यास परवानगी देत नाहीत असे म्हटले.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय...

# राष्ट्रीय चेतनेचा उदय

अयोध्येतील राम मंदिराच्या शिखरावर धर्मध्वज विराजमान झाला तो दिवस मंगळवार २५ नोव्हेंबर २०२५. या भव्य मंदिरावर धर्मध्वज फडकवणे हा केवळ धार्मिक क्षण नाही, तर सनातन श्रद्धेच्या जागतिक प्रतिष्ठेचा पुरावा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण करताच, ह्यजय श्री रामह्लच्या भावनिक जयघोषात उपस्थित विशाल जनसमूह हेलावला. धर्मध्वज फडकवण्याच्या ऐतिहासिक क्षणाने संपूर्ण अयोध्यानगरी भक्तीने भारावून गेली. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर, धर्मपाठासह, भाविकांमध्ये ह्यजय श्री रामह्लचा जयघोष दुमदुमला. हे केवळ मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्याचेच नव्हे, भारताच्या सांस्कृतिक जाणिवेचे प्रतीक होते. दुस-्या बाजूला हा क्षण पाच शतकांपासून चालत आलेल्या संघर्षाच्या सार्थकतेचे प्रतीक ठरतो. १५२८ मध्ये मोगल शासक बाबरचा सेनापती मीर बाकी याने प्रभू श्री रामचंद्रांच्या जन्मस्थानाचे पवित्र मंदिर उद्ध्वस्त करून त्यावर बाबरी मशीद बांधली. संघषार्ची बीजे रोवली गेली ती तेव्हापासूनच. तो संघर्ष केवळ जमिनीच्या तुकड्यासाठी नव्हता, तर ह्यआस्थाह्ल आणि ह्यअनास्थाह्ल यांच्यातला होता. भारताच्या आत्म्यावरचे ते आक्रमण होते. श्री रामभक्तांनी तेव्हापासूनच रामजन्मभूमी मुक्त करण्यासाठी अविरत संघर्ष केला, प्रसंगी बलिदानही दिले. इतिहासातील नोंदीनुसार, या संपूर्ण काळात तब्बल ७६ मोठे संघर्ष झाले आणि असंख्य कारसेवकांचे, साधू-संतांचे रक्त सांडले. १८५३ मध्ये हिंदू-मुस्लीम समाजात यावरून पहिला मोठा वाद झाला. त्यानंतर १८८५ मध्ये महंत रघुबर दास यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. ९० च्या दशकात विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वाखाली श्री रामजन्मभूमी आंदोलन उभे राहिले. ह्यश्री रामलला हम आयेंगे, मंदिर भव्य बनायेंगेह्ल ही घोषणा देशव्यापी झाली. मग ६ डिसेंबर १९९२ ची घटना असो, वा त्यानंतरचा न्यायालयीन लढा; प्रत्येक टप्पा हा या यज्ञातील एका आहुतीसारखाच होता. ५०० वर्षांच्या संघषार्चा निर्णायक क्षण आला तो ९ नोव्हेंबर २०१९ रोजी. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक आणि एकमताने निर्णय देत, वादग्रस्त जमीन श्रीराम मंदिराला देण्याचा स्पष्ट आदेश दिला. त्यानंतर ५ ऑगस्ट २०२० रोजी पंतप्रधान मोदींच्या हस्ते या भव्य मंदिराचे भूमिपूजन झाले आणि बांधकामाची सुरुवात झाली. भगवान राम जन्मभूमीवर भव्य मंदिर बांधण्याची इच्छा पूर्ण होण्यास इतका कालावधी का लागला? त्याची अनेक कारणे आहेत. स्वातंत्र्यानंतर सर्वोच्च प्राथमिकता असूनही, संकुचित राजकीय विचारांमुळे ती दुर्लक्षित राहिली. कोणत्याही स्वाभिमानी राष्ट्राची प्राथमिक जबाबदारी म्हणजे स्वातंत्र्य मिळताच आक्रमणामुळे बाधित झालेल्या पुरातन वारसा जपण्यासाठी ते अवशेष पुसून टाकणे. जगभरातील अनेक देशांनी हेच केले आहे. रशियन साम्राज्याने बांधलेले ऑर्थोडॉक्स चर्च पाडण्याचा पोलंडचा निर्णय हे एक उदाहरण त्यासाठी देता येईल; परंतु भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सांस्कृतिक वारशाचा अभिमान असलेले राजकीय नेतृत्व नसल्याने अनेक वर्षं राम मंदिराच्या निमार्णाकडे आपण लक्ष दिले नाही. हिंदुधर्मियांचे आस्थेचे स्थान असलेले राम मंदिर अयोध्येत बांधून पूर्ण झाले, ते केवळ न्यायव्यवस्थेने वाद सोडवण्याचा निर्णय घेतल्यामुळे नाही, तर मोदी सरकारने अनुकूल धार्मिक सलोख्याची परिस्थिती निर्माण केल्यामुळे न्यायव्यवस्था ती सोडवू शकली. याउलट, आधीच्या बहुतेक केंद्र सरकारांनी अशा परिस्थितीत कोणतीही ठोस पावलं उचललेली दिसली नाहीत. हे संकुचित राजकारण तसेच मॅकॉलेच्या शिक्षण व्यवस्थेतून जन्मलेल्या मानसिकतेमुळे होते, ज्याचा उल्लेख पंतप्रधान मोदी यांनी अयोध्येतील आपल्या भाषणातून केला होता. यापूर्वीची गुलाम मानसिकता पूर्णपणे नष्ट करण्याची गरज असल्याचे पंतप्रधानांनी यावेळी अधोरेखित केले. मॅकॉलेच्या शिक्षण व्यवस्थेतून जन्मलेल्या मानसिकतेने भारतीय समाजाला केवळ त्याच्या समृद्ध सांस्कृतिक जाणिवेपासून दूर नेले नाही, तर त्या वारशाबद्दल मनात न्यूनगंडाची भावना निर्माण केली. पंतप्रधान मोदी यांनी पुढील दहा वर्षांत ही मानसिकता मुक्त करण्याचा दृढनिश्चय केला आहे, हे काही कमी नाही, पण हे तितकेसे सोपेही नसल्याने त्यासाठी शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल आवश्यक आहे. त्यांनी तेही अयोध्याभूमीतूनच सांगितले आहे.

धर्मध्वजाबाबतच्या पारंपरिक श्रद्धा आहेत. हे शक्ती, वैभव आणि संरक्षणाचेही एक शक्तिशाली प्रतीक मानले जाते. शास्त्रांमध्ये त्याचे वर्णन ऊर्जा आणि आध्यात्मिक तेजाचे प्रकटीकरण म्हणून केले आहे. राम मंदिरात फडकवल्या जाणा-या ध्वजाचा भगवा रंग देखील विशेष ओळख करून देतो. तो दीर्घकाळापासून शौर्य, त्याग, भक्ती आणि शक्तीचे प्रतीक आहे. ध्वजावर चित्रित केलेले सूर्य चिन्ह ऊर्जा, प्रकाश आणि जीवन दर्शवते, तर त्याच्या मध्यस्थानी कोरलेले ह्यॐह्ल हे सौर मंडळाचे पहिले आणि अंतिम उच्चारण आहे, जे आध्यात्मिक शक्ती आणि देवत्व दर्शवते. कचनारची एक प्रजाती, कोविदार वृक्ष हा अयोध्येचा राज्यवृक्ष आहे. भरत जेव्हा रामाला राजी करण्यासाठी चित्रकूटला गेला तेव्हा त्याच्या रथावर ह्यकोविदारह्ल असा शिलालेख असलेला ध्वज होता, असे असंख्य संदर्भ आहेत. खरं तर, आज भारत केवळ आपल्या चेतना, मन आणि काळाला स्वतःच्या चेतनेशी जोडत नाही, तर भविष्यासाठी ऊर्जा आणि दिशा देखील निश्चित करत आहे. दिशा, चेतना आणि आदर्शांचा हा संगम असाधारण आहे. एकीकडे ते कल्याणकारी लोकपरंपरेचे बीज धारण करते, तर दुसरीकडे, त्याच्या आध्यात्मिक-सांस्कृतिक आदर्शांची आणि शौयार्चीही खोल जाणीव आहे.

# पाकिस्तान हुकूमशाहीच्या दिशेने...



पाकिस्तानने संरक्षण दल प्रमुख असे पद निर्माण करत त्याची जबाबदारी लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्याकडे सोपवली. नवीन दुरुस्ती विधेयकांतर्गत, पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती मुनीर यांची या पदावर नियुक्ती करतील. यामुळे लष्करप्रमुखांना राष्ट्रपती, पंतप्रधान आणि सर्वोच्च न्यायालयापेक्षा जास्त अधिकार मिळणार असल्याने पाकिस्तानमध्ये हुकूमशहाचा उदय होऊ घातला आहे.

पाकिस्तान संविधानाच्या कलम २४३ मध्ये सुधारणा करत आहे. त्यासाठी संसदेत २७वे दुरुस्ती विधेयक सादर करण्यात आले. पाकिस्तानी सरकारने सैन्यांमध्ये चांगले समन्वय स्थापित करण्यासाठी हे पद तयार केले जात आहे, असे सांगितले असले, तरी प्रत्यक्षात ते भारताचे अनुकरण आहे. भारतात जसे सरसेनाध्यक्षपद तयार करण्यात आले, तसे पाकिस्तानमध्ये हे पद तयार करण्यात आले; परंतु भारतात लोकशाही आहे आणि इथल्या सरसेनाध्यक्षांना पंतप्रधान आणि राष्ट्रपतींपेक्षा जास्त अधिकार नाहीत. पाकिस्तानमध्ये असीम मुनीर यांच्यासाठी ही घटनादुरुस्ती करण्यात आली असून, आता त्यांच्या एकाच आदेशाखाली सेना, नौदल आणि हवाई दल काम करू शकतील. सामान्यतः लष्करप्रमुखांना संरक्षण दल प्रमुख म्हणून नियुक्त केले जाते. पंतप्रधान आणि राष्ट्रीय धोरणात्मक कमांडच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती त्यांची नियुक्ती करतात. संरक्षण दलांचे प्रमुख हे तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख म्हणूनही ओळखले जातात; परंतु ह्यऑपरेशन सिंदूरह्लमुळे हादरलेल्या पाकिस्तान सरकारने घाईगडबडीत केलेल्या घटनादुरुस्तीमुळे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला. ह्यऑपरेशन सिंदूरह्लनंतर पाकिस्तान सरकारने मुनीर यांना ह्यफील्ड मार्शलह्ल म्हणून बढती दिली. ह्यफील्ड मार्शलह्ल हे पाकिस्तानी सैन्यातील दुस-या क्रमांकाचे सर्वोच्च पद आहे. आता संविधानात सुधारणा करून मुनीर यांना तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख बनवण्यात आले. या नवीन दुरुस्ती विधेयकांतर्गत पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सल्ल्यानुसार अध्यक्ष आसिफ अली झरदारी हे मुनीर यांना ह्यसीडीएफह्ल पदावर नियुक्त करतील. ही घटनादुरुस्ती पाकिस्तानात लष्करी राजवटीच्या नवीन युगाची सुरुवात आहे.

भारताच्या फाळणीनंतर काही वर्षांनी पाकिस्तानमध्ये पहिला मार्शल लॉ लागू करण्यात आला. १९५८ मध्ये जनरल अयुब खान यांनी राष्ट्रपती इस्कंदर मिर्झा यांना काढून टाकले आणि मार्शल लॉ लागू केला. १९५८ ते १९७१ पर्यंत चाललेला हा पाकिस्तानचा पहिला लष्करी हस्तक्षेप होता. या काळात २५ मार्च १९६९ रोजी अयुब यांनी पदाचा राजीनामा दिला आणि याह्या खानकडे सत्ता सोपवली. १९७७ मध्ये दुसरा लष्करी उठाव झाला, तेव्हा जनरल झिया-उल-हक यांनी पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांचे सरकार उलथवून टाकले. झिया यांचे शासन १९७७ ते १९८८ पर्यंत चालले. १९९९ मध्ये तिसरा उठाव झाला.

भारताकडून कारगील युद्ध हरल्यानंतर जनरल परवेझ मुशर्रफ आणि तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्यात संघर्ष निर्माण झाला. यामुळे १९९९ मध्ये मुशर्रफ यांनी लोकशाही सरकार उलथवून टाकले. मुशर्रफ यांचे शासन २००८ पर्यंत टिकले. हा सर्व इतिहास पाहिला, तर पाकिस्तानमध्ये सत्तेची चावी लष्कराकडे आहे, हे स्पष्ट होते. असे असले, तरी २००८ पासून पाकिस्तानमध्ये कोणत्याही लष्करी अधिका-्याने सत्तेचे सूत्र हाती घेतलेले नाही.

अर्थात सत्तेची सूत्रे नेहमीच लष्करी मुख्यालयात बसलेल्या जनरलकडे राहिली आहेत. पाकिस्तानमध्ये लोकशाही सरकारने लष्कराला आव्हान देण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ते उलथून टाकण्यात आले. संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी अलीकडेच सध्याच्या सरकारचे वर्णन ह्यहायब्रिड सरकारह्ल असे केले. हायब्रिड म्हणजे ते अशा व्यवस्थेचा संदर्भ देतात, ज्यामध्ये लष्करी नेतृत्व आणि नागरी सरकार एकत्रितपणे निर्णय घेतात. आता मात्र ही परिस्थिती बदलणार आहे. १९७३ नंतर पहिल्यांदाच पंतप्रधानांनी लष्करप्रमुख मुनीर यांची ह्यफील्ड मार्शलह्ल म्हणून नियुक्ती केली आहे आणि आता त्यांना ह्यसंवैधानिक संरक्षणह्ल प्रदान करणे आवश्यक होते.

त्यासाठी घटनादुरुस्ती करण्यात आली. गेल्या वर्षी पाकिस्तान लष्कर कायद्यातील दुरुस्तीने लष्करप्रमुखांचा कार्यकाळ वाढवला होता; परंतु त्यांच्या नियुक्तीच्या वेळी मुनीर यांच्यासाठी तीन वर्षांची अधिसूचना जारी करण्यात आली होती. ह्यऑपरेशन सिंदूरह्लची धास्ती घेतलेल्या पाकिस्तानने घटनेमध्ये २७ वी दुरुस्ती केली. हे करताना तिथल्या सरकारने स्वतःच्या पायावर कु-्हाड मारून घेतली आहे. लष्करप्रमुखांकडे जादा अधिकार सोपवताना पाकिस्तानचे लोकनियुक्त सरकार त्यांच्या हातची कळसूत्री बाहुली ठरणार आहे. या निर्णयाविरोधात माजी पंतप्रधान इम्रान खान यांचा पक्ष रस्त्यावर उतरला असला, तरी त्याला काहीच अर्थ नाही. हे विधेयक सशस्त्र दलांशी संबंधित असलेल्या संविधानाच्या कलम २४३ मध्ये सुधारणा करते. या विधेयकाअंतर्गत राष्ट्रपती पंतप्रधानांशी सल्लामसलत करून लष्करप्रमुख आणि संरक्षणप्रमुखांची नियुक्ती करतील. लष्करप्रमुख आता संरक्षण दलाचेही प्रमुख असतील. शिवाय, संरक्षण प्रमुख पंतप्रधानांशी सल्लामसलत करून राष्ट्रीय धोरणात्मक कमांडच्या प्रमुखाची नियुक्ती करतील. मुनीर यांना आधीच ह्यफील्ड मार्शलह्लचा दर्जा देण्यात आला होता. ताज्या संविधान दुरुस्ती विधेयकामुळे त्याला घटनात्मक मान्यता मिळाली. मुनीर यांच्याकडे ह्यफील्ड मार्शलह्लचे पद आणि विशेषाधिकार आयुष्यभर राहतील. याव्यतिरिक्त, संयुक्त ह्यचीफ ऑफ स्टाफ कमिटीह्लच्या अध्यक्षपदाची पदवी रद्द केली जाईल. नवीन कायदा सरकारला फील्ड मार्शल, एअर फोर्स मार्शल आणि डमिरल ऑफ द फ्लीटह्ल या पदांवर अधिका-्यांना बढती देण्याचा अधिकार देतो. पाकिस्तानच्या इतिहासात या पदावर बढती मिळालेले ते दुसरे सर्वोच्च लष्करी अधिकारी बनले. या व्यतिरिक्त, लष्करी समन्वय सुधारण्यासाठी त्यांनी संरक्षण दलप्रमुख पद निर्माण करण्याची योजना आखली. नव्या घटनादुरुस्तीनंतर पंतप्रधानही ह्यफील्ड मार्शलह्लला काढून टाकू शकत नाहीत. पंतप्रधान ह्यराष्ट्रीय स्ट्रॅटेजिक कमांडह्लच्या कमांडरची नियुक्ती करतील. त्यामुळे पाकिस्तानच्या कमांड रचनेवर लष्करी नियंत्रण स्थापित होईल.

शिवाय, पंतप्रधानांना ह्यफील्ड मार्शलह्लची पदवी काढण्याचा, महाभियोग चालवण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार राहणार नाही. निवृत्तीनंतर फील्ड मार्शलना अतिरिक्त जबाबदा-्या देता येतील. शरीफ यांच्या सरकारने लष्करप्रमुख आणि फील्ड मार्शल यांच्या पदांना संवैधानिक दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. मुनीर यांच्या अधिकारांमध्ये वाढ करण्यासाठी एक घटनात्मक सुधारणा आणण्यात आली आहे. संसदेत २७ व्या घटनात्मक दुरुस्तीमुळे लष्करप्रमुखांना प्रचंड अधिकार मिळणार आहेत. या दुरुस्तीमुळे संरक्षण दल प्रमुख हे एक नवीन पद निर्माण होईल. मुनीर यांच्याकडे पंतप्रधानांपेक्षा जास्त अधिकार असल्याचे म्हटले जात असले, तरी ते २७व्या घटनादुरुस्तीद्वारे स्वतःसाठी आजीवन सुरक्षा भिंत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.



# आकाश निळे का दिसते ?

सीता व नीता या दोघी बहिणी. त्यांना जसा अभ्यासात रस होता तशीच त्यांना वाचनाचीही भारी आवड होती. त्यामुळे सतत काही ना काही नवीन वाचनाचे पुस्तक त्या शाळेच्या ग्रंथालयातून आणून वाचायच्यात. विशेष म्हणजे त्यांचे आई-बाबा दोघेही या दोघींना अवांतर बोधप्रद, प्रेरणादायी व संस्कारक्षम पुस्तकांच्या वाचनासाठी नेहमी प्रोत्साहन द्यायचे. त्या दररोज नियमितपणे शाळेत जायच्या व शाळेतून संध्याकाळी घरी आल्याबरोबर प्रथम आपला गृहपाठ उरकून घ्यायच्या. नंतर आपले अवांतर वाचन करायच्या. ते झाल्यावर आपल्या प्राध्यापिका मावशीला विविध प्रश्न विचारून तिच्याकडून आपली जिज्ञासापूर्ती करून घ्यायच्या. मावशी! तू आम्हाला आज आकाशाच्या रंगाबद्दल माहिती सांगणार आहेस ना?ह्व उत्सुकतेने सीताने विचारले. ह्लसांग ना मावशी, लवकर! हे आकाश का दिसते निळसर?ह्व नीता उतावीळपणे पटकन म्हणाली. ह्लव्वा! तू तर जणू काही कवितेची ओळच जोडली गं नीता.ह्व मावशी म्हणाली. ह्लअगं मावशी, नीता आत्तापासून छान छान कविता करते.ह्व सीता बोलली. ह्लआणि तू काय करतेस?ह्व मावशीने सीताला विचारले. ह्लमी हिच्या कविता वाचते.ह्व सीताने पटकन उत्तर दिले. ह्लचांगल्या हजरजबाबी मुली आहेत गं माज्या.ह्व मावशी आनंदाने बोलली. ह्लनुसती वाचतच नाही मावशी ही. तर कवितांना छान चाल लावून गोड आवाजात गातेसुद्धा.ह्व नीताने सांगितले.

खूपच छान. म्हणजे माज्या लाडक्या मुलींजवळ, एकीजवळ लेखनाचा तर दुसरीजवळ गायनाचही गुण आहे तर!ह्व मावशीने मुलींचे कौतुक केले. ह्लजाऊ दे गं मावशी, तू आता आम्हाला पटकन माहिती सांग बरं.ह्व आता सीता झटकन म्हणाली.

सांगते! सांगते!ह्व मावशी सांगू लागली, ह्लतुम्ही आता शांत राहा. सगळ्या वैज्ञानिक संज्ञांच्या सुलभ स्पष्टीकरणासह मी तुम्हाला सोप्या भाषेत सारे काही समजावून सांगते. मी सांगितलेले तुम्ही नीट ऐका म्हणजे हे पुस्तक वाचल्यानंतर तुम्हाला काहीच अडचण येणार नाही. तसेही हे पुस्तक इतक्या सोप्या व रंजक भाषेत लिहिलेले आहे की तुम्हालाच काय कोणालाही हे पुस्तक वाचताना मुळीच कठीण वाटणार नाही, कंटाळा येणार नाही. पुस्तक वाचता वाचताच सगळ्या गोष्टी नीट समजतात. सर्व संकल्पना छानपणे कळतात. पण मी आता स्वतः येथे आलेलीच आहे, तर तुम्हाला आणखी जास्त स्पष्ट करून सांगते. तुमची बुद्धिमत्ता चांगलीच आहे याबद्दल काहीच शंका नाही. तरी तुम्ही ऐकलेले सारे लक्षात ठेवा नि तुमच्या मैत्रिणींनासुद्धा तसेच समजाऊन सांगा. पटलं ना? हो! हो! मावशी! आम्हाला एकदम मान्य आहे.ह्व दोघीही एकसुरात म्हणाल्या. ह्लबरे आपण विकिरणाच्या माहितीपासून सुरुवात करू,ह्व असे म्हणत मावशी सांगू लागली.ङ्ग ह्लविकिरण म्हणजे वातावरणातील धुळीच्या कणांवरून सूर्यप्रकाशाचे चोहीकडे पसरणे. विकिरण झालेल्या प्रकाशामध्ये निळ्या व जांभळ्या रंगांच्या प्रकाशाची तीव्रता जास्त असते. जांभळ्या प्रकाशाची तरंगलांबी ही तांबड्या प्रकाशाच्या तरंगलांबीपेक्षा जवळजवळ निम्मी असल्यामुळे, विकिरण झालेल्या प्रकाशामध्ये जांभळ्या प्रकाशाचे प्रतिशत प्रमाण हे तांबड्या प्रकाशापेक्षा जवळजवळ सोळा पटींने जास्त असते. म्हणून विकिरण झालेला प्रकाश आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचण्याच्या अगोदर त्याचे पुन्हा पुन्हा विकिरण झाल्यामुळे जांभळ्या रंगाची तीव्रता कमी कमी होत जाऊन तो वातावरणात नष्ट होतो व शेवटी सर्वात कमी तरंगलांबीचा निळा रंगच शिल्लक राहतो. तसेच प्रकाशात निळ्या रंगाचे प्रमाण जास्त असल्याने तो जास्त पसरतो.

# मराठवाड्यात खासदार, आमदारांची सत्त्वपरीक्षा



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत सध्या राजकीय रंगत भरली आहे. नगर परिषदेच्या निवडणुकीत सर्वाधिक नगराध्यक्ष व नगरसेवक आपल्याच पक्षाचे निवडून यावेत यासाठी सत्ताधारी पक्षातील भाजप, एकनाथ शिंदे गट तसेच अजित पवार गटाने कंबर कसली आहे. याविरुद्ध विरोधी पक्षांत असलेल्या काँग्रेस व उबाठा गटाने देखील यासाठी जोरदार प्रयत्न सुरू ठेवले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील प्रचार सभा तसेच नांदेड जिल्ह्यातील लोहा येथील प्रचार सभा लक्षवेधक ठरली. मुख्यमंत्र्यांच्या दौ-्यामुळे मराठवाड्यातील सर्वच भाजप उमेदवारांना मोठे बळ मिळाले आहे. अयोध्येत पार पडलेल्या धर्मध्वज सोहळ्याचा फायदा देखील मोठ्या प्रमाणात भाजपला मिळणार आहे. अयोध्येतील कार्यक्रमामुळे तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित राष्ट्राविषयीच्या भूमिकेमुळे भाजपचे संख्याबळ मराठवाड्यात निश्चितच वाढणार आहे. केंद्रातील सत्ताधारी भाजप तसेच राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राज्याच्या विकासासाठी असलेली भूमिका प्रत्येक प्रचार सभेतून स्पष्ट केली जात आहे. भाजपच्या अनेक नेत्यांनी तसेच विविध नेत्यांनी मराठवाड्यात भाजपचे सर्वाधिक नगराध्यक्ष व नगरसेवक निवडून यावेत यासाठी सूक्ष्म नियोजन करीत पक्षाचे कार्य व विकासाची दिशा स्पष्ट करत मतदारांकडे आपली भूमिका मांडली. याचबरोबर राज्यात सत्तेत असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील मराठवाड्यात विशेष लक्ष केंद्रित केले. मराठवाड्यातील धाराशिव तसेच नांदेड जिल्ह्यात त्यांच्या विक्रमी सभा पार पडल्या. आपल्याकडे तिजोरीची चावी आहे, असे सांगत त्यांनी मतदारांना आकर्षित केले. शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मराठवाड्यातून जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणावेत असे आदेश त्यांच्या सहकारी मंत्र्यांना दिले आहेत. त्या दृष्टीने राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी मराठवाड्यात आपली शक्ती पणाला लावली आहे. मंत्री संजय शिरसाट यांनी नांदेड जिल्ह्यातील सभेत भाजपचे खासदार अशोकराव चव्हाण यांच्यावर केलेली टीका राज्यभर गाजत आहे. खासदार अशोक चव्हाण हे अन्न खातात की नाही, असा प्रश्न आपल्याला पडला आहे, अशी टीका करून त्यांच्याकडे असलेल्या भरमसाट एजन्सीचा पाढाच वाचला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील मंत्र्यांनी मते मिळविण्यासाठी टीकेची झोड उठवली आहे. प्रत्यक्षात भाजपवर टीका न करता त्या पक्षातील नेत्यांना रडारवर ठेवले जात आहे. मंत्री संजय शिरसाट यांच्या सभेत अशोक चव्हाण यांच्या विरुद्ध बोलत त्यांनी नांदेड जिल्ह्यात सभा गाजवली. राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत ग्रामीण भागातील नाळ पक्की करण्यावर जोर दिला आहे. त्यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे नेते सर्वाधिक नगराध्यक्ष व नगरसेवक निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करत आहेत. परभणी जिल्ह्याच्या नेत्या तसेच भाजपच्या मंत्री मेघना बोर्डीकर यादेखील भाजपचे उमेदवार कसे निवडून येतील या दृष्टीने प्रयत्नशील आहेत; परंतु त्यांच्या तोडीला असलेल्या उबाठा गटातील नेत्यांनी त्यांना जेरीस आणले आहे. बीड जिल्ह्यातील मंत्री पंकजा मुंडे यांची देखील कसोटी पणाला लागली आहे. बीड जिल्ह्यात असलेल्या काही संवेदनशील भागातील मतदान प्रक्रिया रखडली जाण्याची भीती काही राजकीय पक्षांनी व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्यातील प्रशासनाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, या दृष्टीने पावले उचलली आहेत. दुसरीकडे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील मराठवाड्यातील लातूर व नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक सभा घेतल्या. एकेकाळी मराठवाड्यातील लातूर व नांदेड जिल्हा हा काँग्रेसचा मोठा गड होता. या दोन्ही जिल्ह्यांनी महाराष्ट्राला एकेकाळी मुख्यमंत्रीपद दिले होते. काँग्रेसच्या कोट्यातून मुख्यमंत्रीपद घेतलेल्या नेत्यांच्या जिल्ह्यात काँग्रेसची दुरवस्था झाली आहे. ही दुरवस्था भरून काढण्याच्या दृष्टीने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे स्वतःच्या पक्षातील उमेदवारांच्या विजयासाठी प्रयत्नरत आहेत. मराठवाड्यातील हिंगोली व परभणी जिल्ह्यात उबाठा गटाचे वर्चस्व आहे.

या ठिकाणी त्यांच्याच पक्षाचे खासदार आहेत. या दोन्ही जिल्ह्यांत त्यांच्या पक्षातील खासदारांनी मोठी शक्ती पणाला लावली आहे. एकंदरीत मराठवाड्यातील भाजप, एकनाथ शिंदे गट, अजित पवार गट व सत्ताधारी पक्षाच्याच आमदारांची व खासदारांची मोठी राजकीय कसोटी आहे. नगर परिषद तसेच नगरपंचायतसाठी २ डिसेंबर रोजी मतदान आहे. तसेच लगेच दुस-्या दिवशी ३ डिसेंबर रोजी मतमोजणी आहे. आपल्या पक्षातील उमेदवारांच्या पारड्यात मते पडावीत, यासाठी मराठवाड्यात सत्ताधारी पक्षातील आमदार एकमेकांच्या विरुद्ध बोलून मत मिळविण्याचे प्रयत्न करीत आहेत. एकंदरीत राज्याचे मुख्यमंत्रीपद हे भाजपकडे आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आजवरची स्पष्ट भूमिका भाजपच्या विजयासाठी फायदेशीर ठरणार आहे. केंद्रातील सत्ताधारी भाजप तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्या स्पष्ट भूमिका जनतेच्या हिताच्या आहेत. त्यामुळे मराठवाड्यात भाजपकडे ओढा असलेले मतदार जास्त संख्येने आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने मराठवाड्याला भरभरून निधी मिळालेला आहे. त्यामुळे त्या निधीने मराठवाड्याचा कायापालट होत आहे. ही बाब लक्षात घेऊन मराठवाड्यातील सर्वाधिक नगराध्यक्ष व नगरसेवक हे भाजपचेच असतील, असा अंदाज राजकीय विश्लेषक व्यक्त करीत आहेत. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत असलेल्या आमदारांचीच ही खरी कसोटी आहे. आपल्या पक्षातील जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणले तर आपल्या पक्षातील वरिष्ठ नेते आपली किंमत करतील, या भावनेतून आमदार मंडळी देखील मराठवाड्यात कामाला लागलेली आहेत.

# महापरिनिर्वाण दिनी पानगावात उसळणार लांखो भिम अनुयांयीचा जनसागर

## अस्थी अभिवादनाची गैरसोय होऊ नये म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्ट कडून जय्यत तयारी

रेणापुरः पानगांव ता. रेणापुर जिल्हा लातुर येथे बौद्ध अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी कलशाला अभिवादन करण्याकरिता दर ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी मराठवाडयासह सिमावर्ती आंध्र प्रदेश,तेंलगना, कर्नाटक भागातुन लाखों आंबेडकरी आनुयांयी अभिवादना करिता येत असतात येणा-्या अनुयांयीची संख्या दरवर्षी वाढत जात असल्याने येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टच्या वतीने येणा-्या अनुयांयीची अभिवादनाची गैरसोय होऊ नये म्हणून जय्यत तयारी केली असुन विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

६ डिसेंबर १९५६ रोजी बहुजणांचे मुक्ती दाते महामानव पं.पु.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाले.आंबेडकरी अनुयांयीसह सारा देश शोकसागरात बुडाला.बाबासाहेबांच्या निवार्णाची बातमी आकाशवाणी रेड-ीओ वरून प्रसारीत करण्यात आली. ही दुखःद बातमी पानगांव ता.रेणापूर जि.लातूर येथील लिंबाजी आचार्य,दगडू आचार्य,प्रभाकर आचार्य,किशन आचार्य,वैजनाथ आचार्य,सुर्यभान आचार्य,यादव आचार्य यांना कळताच बाबासाहेबाचे अंतिम दर्शन घेण्या करिता मुंबईला गेले होते येताना त्यांनी तेथील अस्थी पानगांवात आणल्या त्याच अस्थीनां अभिवादन करण्यासाठी दर ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी लांखो आनुयांयी उपस्थित रहातात.येणा-्या अनुयांयीची गैरसोय होऊ नये म्हणुन




डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टच्या वतीने जय्यत तयारी केली गेली आहे.त्याच प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे.

दि.६ डिसेंबर रोजीच्या ००.०१ मिनिटाला ह्लअस्थीह्न कलशास पुष्पचक्र अर्पन,(भंदत डॉ.उपगुप्त महाथेरो,भंदत पय्यानंद थेरो हे सामुहिक पंचशिल-त्रिशरण,बुद्धवंदना घेवुन अभिवादनाची सुरवात करतील.)मा.मिनाताई मोटाडे (सरपंच -ग्रामपंचायत कार्यालय पानगांव) यांच्या शुभ हस्ते सकाळी १०.०० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे ध्वजा रोहन (निळा ध्वज अर्ध्यावर) करण्यात येईल.

मा.प्रशांत थोरात (रेणापुर तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार ) यांच्या शुभ हस्ते सकाळी १०.४० वाजता डॉ. आंबेडकर नगरात असलेल्या अस्थी कलशा जवळ ध्वजारोहन (निळा ध्वज अर्ध्यावर) पार पडणार आहे. दुपारी अस्थी स्थळावरूनच भिक्कू संघ धम्म देसना देणार आहेत.रात्री ९.०० वाजता अस्थी स्थळी परिसरातील विविध कला संचाचा भिम गितांचा कार्यक्रम होणार असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टचे भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो (अध्यक्ष) भदंत पय्यानंद थेरो, आयु. आबासाहेब चव्हाण, आयु. व्ही.बी. आचार्य (सचिव), आयु. एन. एल. आचार्य (उपाध्यक्ष), आयु. सुर्यभान आचार्य (ह्यअस्थीह्न आणणारे) आयु. डी.एन. आचार्य (सहसचिव), आयु. पी. आर. रोडे (सहसचिव), आयु. के. ई. हरीदास, आयु. डि.बी.आचार्य,आयु. सुभाष आचार्य, आयु. गोरोबा आचार्य, आयु.जे.सी.पानगांवकर,आयु. किशोर आचार्य,आयु.नागनाथ चव्हाण,आयु.विष्णु आचार्य,आयु.पंडीत आचार्य, आयु. सुकेश भंडारे, आयु. गौतम आचार्य, आयु. क्षितीज रोडे, आयु. तुकाराम कांबळे,आयु.रमेश तिगोटे, आयु. नारायण आचार्य, आयु. रत्न राज आचार्य,आयु. रणजित आचार्य,आयु. महेंदकुमार आचार्य,आयु. विश्वजीत आचार्य,आयु.आण्णाराव आचार्य, आयु. किसन चव्हाण, भानुदास आचार्य, तुकाराम कांबळे, आयु. राजकुमार साळवे, आयु. गौतम गोडबोले, आयु. सत्यशिला आचार्य, आयु. प्रजावती आचार्य यांनी कळविले आहे.

# सत्ता, पैसा आणि दडपशाहीचा अहंकार मोडून काढा; गंगाखेड नगर परिषदेत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीला विजयी करण्याचे आ. अमित देशमुख यांचे आवाहन

गंगाखेडः भ्रष्टाचारमुक्त, पार-दर्शक, आणि सर्वसमावेशक कारभार करून, गंगाखेड शहराचा सर्वांगीण विक-ास साधण्यासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आघाडीच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजय करावे, असे आवाहन आज सक-ाळी गंगाखेड येथे आयोजित प्रचारसभेत बोलताना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड नगरपरिषद निवडणुकीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज सकाळी गंगाखेड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आयोजित केलेल्या प्रचार सभेत जनतेशी संवाद साधला यावेळी ते



बोलत होते. या प्रचार सभेस माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील, माजी आमदार सुरेश देशमुख, काँग्रेस पक्षाच्या एससी सेलचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबीरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे, श्री इनामदार, काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष गोविंद यादव, शहराध्यक्ष युनुस शेख यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते, या सभेला गंगाखेडच्या जनतेकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. दक्षिणेतील काशी आणि संत जनाबाईंचे जन्मस्थळ म्हणून ओळख असलेल्या परभणी जिल्ह्यातील गोदाकाठचे गंगाखेड हे सामाजिक एकोपा जपणारे शहर आहे, असून या शहराने कायम काँग्रेस पक्षाला साथ दिली असल्याचे यावेळी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी नमूद केले.

राज्यात आणि देशात सध्या सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता मिळवणा-्या मंडळींनी एकाधिकारशाही चालवली आहे, गंगाखेड मध्येही हे लोन आता येऊन पोहोचले आहे, लोकांचा कितीही विरोध असला तरी दडपशाही आणि पैशाचा जोरावर आपण निवडणुका जिंकू शकतो असे सत्ताधा-्यांना वाटू लागले आहे, त्यांचा हा अहंकार मोडीत काढण्याची संधी नगरपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने आपणाला मिळालेली आहे. सर्वधर्मसमभाव मांडणा-या काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार) आघाडीने येथे नगराध्यक्ष पदासाठी उजमामाई युनुस शेख या सुशिक्षित युवतीला उमेदवारी दिली असून नगरसेवक पदासाठीही कार्यक्षम उमेदवार दिले आहेत असे यावेळी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सांगितले.

शहरात राबविण्यात येणा-्या योजनांसाठी मंजूर निधी त्याच ठिकाणी खर्च करून दजेर्दार कामे करण्याची हमी काँग्रेस राष्ट्रवादी आघाडीच्या वतीने देण्यात येत आहे, त्यामुळे कोणत्याही आमिषाला बळी न पडता, निर्भयपणे हाताचा पंजा आणि आणि तुतारी या चिन्हा समोरील बटन दाबून काँग्रेस उमेदवारांना विजयी कर-ावे असे आवाहन शेवटी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

# विकासाच्या मुद्यावर औसेकर आमच्या सोबतः बसवराज पाटील




औसाः औसा तालुक्याच्या ठिकाणी १०० खाटांचे अत्याधुनिक पाचमजली उपजिल्हा रुग्णालय उभारून अभिमन्यू पवार यांनी आरोग्य सुविधेत ऐतिहासिक वाढ केली आ-हे. त्याचबरोबर तालुक्यात शेतरस्त्यांचे विस्तृत जाळे, औसा शहरातील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा योजना अशी अनेक विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे मत मागण्याचा नैतिक व विकासाधिष्ठित अधिकार आमच्याकडे अधिक आहे. अशी भूमिका माजी मंत्री व भाजपाचे जिल्हाध्यक्ष बस-ावराज पाटील यांनी भाजप-शिवसेना-रिपाई महायुतीच्या अधिकृत उमेदवार डॉ. ज्योती महादेव बनसुडे यांच्या प्रचारार्थ सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, विकासातूनच औशाची स्वतंत्र ओळख राज्यात निर्माण झाली आहे. ही निवडणूक विकासाची आहे. विरोधकांनी आरोप-प्रत्यारोप न करता आपण पदावर असताना लोकांसाठी कोणती कामे केली, यावर बोलावे. आम्ही विकासाची कामे मांडतो तेव्हा लोक आम्हाला पुन्हा पुन्हा संधी देतात.

# पैलवान अक्षय शेळकेची दणदणीत विजय

## एक किलो चांदीची गदा आणि रोख ११ हजाराचे बक्षीस

औसाः खंडोबा यात्रा महोत्सवानिमित्त औसा तालुक्यातील मातोळा येथे आयोजित पारंपरिक कुस्ती स्पर्धेर्ला उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला. या भव्य कुस्ती स्पर्धेत टाका येथील दमदार मल्ल अक्षय शे-ळके यांनी प्रभावी खेळ करत सोलापूरच्या रामा शेळकेला चितपट करून मानाची कुस्ती आपल्या नावावर केली.

विजयानंतर आयोजक मंडळाच्या वतीने अक्षय शेळके यांना एक किलो चांदीची गदा आणि रोख रक्कम ११,००० रुपये देऊन गौरविण्यात आले. यावेळी मारुती महाराज कारखान्याचे चेअरमन श्याम भोसले, उपसरपंच गणेश भोसले, तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत विजेत्या पैलवानाचा भव्य सत्कार करण्यात आला.गेल्या अनेक वर्षांपासून मातोळा येथे खंडोबा यात्रा महोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या महोत्सवाचा मुख्य आणि सर्वाधिक लोकप्रिय भाग म्हणजे भव्य कुस्ती स्पर्धा. दरवर्षीप्रमाणे यंदाही लातूर, उस्मानाबाद,



सोलापूर, बीड इत्यादी जिल्ह्यांसह आसपासच्या क्षेत्रातील मानाचे मल्ल या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी झाले.

वेगवेगळ्या वयोगटातील झालेल्या लढतींमध्ये उत्तम कामगिरी करणा-या विजेत्या मल्लांना आयोजक मंडळातर्फे रोख रक्कम व सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. उपस्थित प्रेक्षकांनीही मातोळ्यातील या पारंपरिक दंगल स्पर्धेर्ला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विजेत्या मल्लांचे कौतुक केले.

### स्मृतीदिनानिमित्त महात्मा फुले यांना अभिवादन

परभणी : महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवा-री (दि.२८) येथील सावता सेनेच्या वतीने महात्मा फुले पुतळा परिसरात आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले. यावेळी शहरातील महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सावता सेनेचे मुंजाजी गोरे, राजकुमार भामरे, राम जाधव, उद्धव समिंद्रे, संतोष इखे, हनुमंत लुटे, अनिल गोरे, सुमित जाधव, रामराव थोरात, रामकृष्ण काळे, माणिक राऊत आदी उपस्थित होते.

# तेली समाजाचा युतीच्या उमेदवारांना पाठींबा जाहीर

**उदगीर** : नगर परिषद निवडणुकीच्या निमित्ताने शहरातील तेली समाज बांधवांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष युतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार स्वाती सचिन हुडे व युतीचे सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार यांना पाठींबा जाहीर केला.

शनिश्वर मंदिर उदगीर येथे पार पडलेल्या बैठकीत सिद्राम चौधरी, भद्राप्पा चौधरी, ऋषिकेश चिल्लरगे, सुरेश चौधरी, गंगाधर बडिहवेली, राजकुमार विश्वनाथे, राजकुमार चिल्लरगे, रमेश निजवंते, सिद्राम सज्जनशेट्टे, शिवशंकर चिल्लरगे, दिलीप अंबुसे, अशोक बडिहवेली, काशिनाथ बनुले, सूर्यकांत भद्रशेट्टे, शंकर विश्वनाथे, बाबुराव चिल्लरगे, मल्लिकार्जुन चिल्लरगे, बी. डी. कुमठेकर, नागनाथ कुमठेकर, संतोष चिल्लरगे, सदाविजय विश्वनाथे, सरस्वती विश्वनाथे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

### राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत बेलेश्वर महाविद्यालयाचे यश

परभणी : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत तालुक्यातील पेडगाव येथील श्री बेलेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या १७ वषार्खालील शटल बॅडमिंटन स्पर्धेत उपविजेतेपद प्राप्त केले. स्पधेर्तील अंतिम सामना पुणे विरूध्द परभणी असा झाला. यात पुणे संघाने परभणीवर २-० अशी मात केली. अनिश्वर्य देशमुख याचा पराभव पुणे येथील खेळाडू आयुष आडे याने केला. दुहेरी सामन्यात परभणी संघाचे अवधूत कदम व सार्थक नलावडे यांचा पराभव पुणेच्या आयुष आडे व ओजस जोशी यांनी केला.

# दत्तक महिनानिमित्त जनजागृती

हिंगोलीः आंतरराष्ट्रीय दत्त-ाक महिनानिमित्त हिंगोली जिल्ह्यात विशेष गरजा असलेल्या मुलांचे (दिव्यांग मुले) संस्थाबाह्य पुनर्वसन या विषयावर जनजागृती उपक्रमांना सुरूवात करण्यात आली. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची भेट घेऊन जिल्हा प्रशासनाने या जनजागृती मोहिमेचा शुभारंभ केला. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी एस. आर. दरपलवार यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांच्या नियोजनानुसार कळमनुरी तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय, कळमनुरी पोलीस ठाणे, बसस्थानक, खाजगी रुग्णालये, प्रसूतीगृहे अशा विविध सार्वजनिक ठिकाणी पोस्टर्स, बॅनर व माहितीपत्रकांच्या माध्यमातून कायदेविषयक जनजागृती करण्यात आली.

### जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

परभणी : शहरातील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कै मुकुंदराव हाके यांच्या स्मृतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पधेर्चे आयोजन नुकतेच करण्यात आले. या स्पधेर्चे उद्घाटन संभाजी शेवटे, गणेश पांडे, सूर्यकांत हाके यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी संभाजी शेवटे यांनी मार्गदर्शन केले. स्पधेर्चे प्रास्ताविक अनिता मनोहरे यांनी केले. स्पधेर्चे परिक्षण निवृत्ती रेखडगेवाड, शिवदास काळबांडे, अनुष्का हिवाळे यांनी केले. शिवदास काळबांडे यांनी तलवारीची धार हो पोवाडा सादर केला.

# शिवलिंगेश्वर फार्मसीचे विद्यापीठस्तरीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत घवघवीत यश



औसाः औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी. फार्मसी व फार्म. डी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ आयोजित विद्यापीठ स्तरीय विद्यार्थी संशोधन अधिवेशन अन्वेषण संशोधन प्रकल्पात सहभाग नोंदवुन प्रभावीपणे सादरीकरणाद्वारे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानांकन मिळविले.

स्वामी रामानंद तिर्थ मराठ-वाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या शुभहस्ते व प्रमुख पाहुणे डॉ. अशोक महाजन नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वा-ढेर, औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. एस. एस. पेक्कमवार, डॉ. एच. एस. फडेवार, डॉ. वसंत वाघ, डॉ. बाबुराव जाधव यांच्या उपस्थितीत विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. भारतीय विद्यापीठ संघाद्वारे देशभर राबविण्यता येणारा अन्वेषण हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती जोपासण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असल्याचे मत कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले. शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मचीच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये विशाल वाडेकर, अचल मुलगीर, गौतम दुर्गम, सोफिया पठाण, अस्मिता इंगळे, गायत्री वाघमारे, साक्षी चामे, संजीवनी फुले, मयुरी थोटे, संजना गुप्ता, अजीज बागवान या विद्याथीर्नी कृषी, मुलभूत विज्ञान, अभियांत्रिकी तंत्रज्ञान, समाजशास्त्र या प्रमुख विभागा अंतर्गत संशोधन प्रकल्पाचे प्रभावीपणे सादरीकरण करुन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानांकन मिळविले. प्रथम क्रमांकाच्या मानांकनासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आगामी बेस्ट झोन अन्वेषण स्पर्धेत सरदार पटेल विद्यापीठ आंनद गुजराथ येथे विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळणार आ-हे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, अन्वेषण समन्वयक प्रा. विद्या कापसे (येलम) यांचे सखोल मार्गदर्शन लाभले.

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष शिचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बस-ावराज धाराशिवे,सहसचिव महादेव खिचडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, योगेश धाराशिवे व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज चे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी यांनी केले.

# दयानंद कला महाविद्यालयात आनंदी शनिवार अंतर्गत योगसाधनेने विद्यार्थ्यांना मिळाली नवी ऊर्जा

लातूरः परीक्षा काळात अभ्यासाच्या ओज्यामुळे विद्यार्थी मानसिक तणावाला सामोरे जातात. या तणावावर मात करण्यासाठी योग, प्राणायाम व ध्यानाचा नियमित सराव अत्यंत उपयुक्त ठरतो, असे प्रतिपादन संगीत विषयाचे प्राध्यापक व योगतज्ज्ञ डॉ. संदीपान जगदाळे यांनी केले.

दयानंद कला महाविद्यालयात ह्लआनंदी शनिवारह्न या उपक्रमांतर्गत इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यासाठी योगझ्ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे व पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. या प्रसंगी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. जगदाळे म्हणाले, ह्लयोगासनामुळे शरीर लवचिक होते, प्राणायामामुळे शरीरातील शुद्धीकरण होते तर ध्यानामुळे मन शांत होते. यामुळे स्मरणशक्ती व एकाग्रता वाढून अभ्यासाकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. त्यामुळे परीक्षेत अधिक चांगले यश मिळण्यास मदत होते.ह्न विद्यार्थ्यांनीदेखील उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अत्यंत मनापासून योगाचे धडे आत्मसात केले. आनंदी शनिवारह्न अंतर्गत महाविद्यालयात फिटनेस अवेअरनेस, झुंबा, गायनझ्र वादनझ्रनृत्य, दहीहंडी, चित्रकला स्पर्धा, पर्यावरणपूरक कापडी पिशव्या तयार करणे असे अनेक उपक्रम सातत्याने राबवले जात असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हे उपक्रम उपकारक ठरत असल्याचे महाविद्यालयाकडून सांगण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संगीत विभाग प्रमुख प्रा. देवेंद्र कुलकर्णी यांचे विशेष योगदान लाभले. गीता बर्डे, साक्षी शेंद्रे, शरयू कुलकर्णी, पूजा पटाईत, श्रद्धा कुंभार, जानवी घोडके, गायत्री शर्मा, आदिनाथ बंद, योगेश चाफेकानडे गणेश स-रवदे आणि त्यांच्या सहका-्यांनी परिश्रम घेतले. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदजी सोनवणे, ललितभाई श-हा, रमेशजी राठी, सचिव रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव विशाल ला-होटी, सहाय्यक सचिव अ‍ॅड. श्रीकांत उटगे, अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा व कार्यालय अधीक्षक संजय व्यास यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

# भावनिक साद घालत मत मागणाऱ्यांपासून सावध राहून सत्तापरिवर्तन कराः आ. अमित देशमुख



निलंगा : विकास कामाला बगल देऊन खोटे बोलत निव्वळ फेकफेकी करून दिशाभूल करणा-या आणि निवडणूक आपला स्वाभिमान, निलंग्याच्या मातीचा स्वाभिमान, असे म्हणत भावनिक साद घालना-यांपासून सावध राहुन निलंगा नगरपरिषदेच्या या निवडणुकीत सत्ता परिवर्तन करा, असे आवाहन माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मतदारांना केले.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दि. २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी निलंगा शहरातील जुने मार्केट यार्ड भागातील आनंदमुनी चौकातील निलंगा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ मधील काँग्रेस महाविकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार हमीद शेख व २३ नगरसेवक पदाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ विराट सभा झाली. त्या प्रसंगी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, निरीक्षक विजय देशमुख, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार हमीद शेख, काँग्रेसचे निलंगा तालुका अध्यक्ष विजयकुमार पाटील, शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष आबासाहेब पाटील, देवणी तालुका अध्यक्ष अजित बेलकुणे, पॅनल प्रमुख अजित नाईकवाडे, सुधाकर पाटील, अजित माने, लाला पटेल, डॉ. अरविंद भातांब्रे, पंकज शेळके, अंबादास जाधव, विलास लोभे, विलास सुर्यवंशी, रोहित बनसोडे, झटिंग म्हेत्रे, चक्रधर शेळके, महेश देशमुख आदीसह काँग्रेस महाविकास आघाडीचे नगरसेवक पदाचे उमेदवार उपस्थित होते.

जाहीर सभेच्या प्रारंभी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि उपस्थित सर्व मान्यवरांनी माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर आणि माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. पुढे बोलताना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले की, निलंगा नगरपरिषद निवडणूक ही देशमुख विरुद्ध निलंगेकर नसून ही सामान्य माणसाची निवडणूक आहे आणि याचे गांभीर्य सवानी लक्षात घ्यावे. मूळ प्रश्नांना बगल द्यायची आणि विनाकारण देशमुख विरुद्ध निलंगेकर आशा प्रकारे निवडणूक प्रचार करून सत्ताधा-यांनी जनतेची दिशाभूल करायची यापासून आपण सावध राहायला हवे. लोकशाही जीवंत राहायला हवी, ती टिकली पाहिजे यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन त्यांनी केले.

पुढे बोलताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, आदरणीय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या समवेत काम करताना बरेच काही शिकायला मिळाले. त्यांची बात काही औरच होती. आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर, आदरणीय विलासराव देशमुख, आदरणीय दिलीपराव देशमुख यांनी आजवर केलेला लातूरचा विकास आपल्या समोर आहे.आणि त्यांनी शिकवलेल्या मार्गावर आम्ही चालतोय आणि विकासाचे राजकारण करीत आहोत हे आवर्जून सांगावे लागेल. विद्यमान सत्ताधारी जाती धर्मात तेढ निर्माण करीत आहेत आपल्याला यांच्यापासून सावध राहावे लागेल. सत्ताधा-यांना तुमची काळजी नाहीये. त्यांना काळजी आहे तिजोरीची. कुणी म्हणते चावी माझ्याकडे आहे, कुणी म्हणते मालक मी आहे, कुणी म्हणतो तिजिरीची साफसफाई मी करतो. त्यांच्या या वक्तव्यावरूनच त्यांचे कर्तृत्व लक्षात येते. आम्हाला मत दिले, आम्ही निवडून आलो तरच तुम्हाला निधी मिळेल, असे देखील हे सत्ताधारी जाहीरपणे म्हणत आहेत. परंतु त्यांनी हे सत्ताधा-यांनी लक्षात ठेवावे की, सरकारच्या तिजोरीत असलेला निधी हा या राज्यातील जनतेचा आहे आणि तो मिळायलाच हवा. हा अधिकार, हा हक्क आपल्याला परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने दिला आहे. हे सत्ताधार्यांनी लक्षात ठेवावे, असे म्हणत सरकारला इशारा दिला.

राजकारणात सद्या निव्वळ सौदेबाजी सुरू असून तुमचे मत विकत घेण्यापर्यंत यांची हिम्मत वाढली आहे. एकदा सत्ताधारी झालो की, पुन्हा लूट करू, अशीच नियती यांची झाली असून यांचे एकच ध्येय दिसून येत आहे राम नाम जपणा, पराया माल आपणा हेच आपण पाहतोय. महाविकास आघाडीने आजवर सर्वधर्मसमभाव जोपासला असून असेच उमेदवार आपल्याला देण्याचे काम आम्ही केले असून आपण यांच्या भूलथापांना अजिबात बळी पडू नका. निलंग्याच्या मातीचा स्वाभिमान असे म्हणत केवळ भावनिक साद घालायची आणि मत घ्यायची हेच याना जमते असेही ते म्हणाले.

आता आपल्याला स्वस्थ बसून चालणार नाही आपले नेते राहुल गांधी यांनी दाखवून दिले आहे की, मतचोरी कशा प्रकारे होत आहे. आपल्याला येणा-या २ डिसेंबर रोजी हे होऊ द्यायचे नाही. आपण सर्वांनी जातीने यात लक्ष घालून मतचोरी होणार नाही, आपले व आपल्या कुटुंबातील सदस्याचे मतदान आठवणीने करून घ्यावे आणि निलंगा नगरपरिषद निवडणूकीत काँग्रेस महाविकास आघाडीच्या नगराध्यक्षांसह सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करून पालिकेत पाठवावे, असे आवाहन यावेळी उपस्थित निलंगा वासीय मतदारांना केले. दरम्यान यावेळी डॉ. अरविंद भातांब्रे, अंबादास जाधव, अजित माने यांनी मनोगत व्यक्त करीत निलंगा नगरपरिषद निवडणुकीतील काँग्रेस महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवाराना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन उपस्थित मतदारांना केले.

## माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडून अभिनंदन



लातूरः लातूर शहराचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर पक्षप्रवेश केल्याबद्दल त्यांचे जोरदार स्वागत आणि अभिनंदन करण्यात आले. पक्षाचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते त्यांनी नुकताच मुंबईत पक्षप्रवेश केला होता.

याच पार्श्वभूमीवर, शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवासस्थानी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी गोजमगुंडे यांचे विशेष अभिनंदन केले. यावेळी युवक नेते तथा शिरूरचे उपसरपंच सुरजभैय्या पाटील आणि पाटील परिवाराच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे पक्षात स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी, विक्रांत गोजमगुंडे यांच्या प्रवेशामुळे लातूर शहरासह जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद निश्चितपणे वाढेल, असा विश्वास व्यक्त केला. गोजमगुंडे यांचा राजकीय अनुभव आणि जनसंपर्क पक्षाच्या विस्तारासाठी महत्त्वाचा ठरेल, असेही ते म्हणाले.या स्वागत समारंभास पाटील परिवारातील सदस्य, पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोजमगुंडे यांच्या पक्षप्रवेशामुळे लातूर शहर आणि जिल्हा पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसला बळ मिळाल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

## संविधान देशाला एक सार्वभौम राष्ट्र म्हणून घोषित करतेः प्रा. डॉ. भीमराव पाटील



लातूरः भारतीय संविधान हे देशाच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या कल्याणासाठी एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. त्याच्या तत्त्वांचा आणि नियमांचा आदर करून, आपण देशाच्या एकात्मतेसाठी आणि लोकशाहीसाठी काम करते.भारतीय संविधान लोकशाही तत्त्वांवर आधारित आहे आणि देशाला एक सार्वभौम राष्ट्र म्हणून घोषित करते ह्व - असे प्रतिपादन राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील प्रा. डॉ. भीमराव पाटील यांनी केले. सिद्धार्थ हौसिंग सोसायटी लातूरच्या वतीने अमृत महोत्सवी संविधान दिनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पाटील बोलत होते. यावेळी पूजनीय भिक्खू पय्यानंद थेरो, भन्ते बोधिराज यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोसायटीचे चेअरमन विठ्ठल जाधव होते.धम्मदेसना देताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले,ह्व आज संविधानाची पावलोपावली पायमल्ली होत आहे, ही गंभीर बाब आहे. संविधानावर हात ठेवून सरकार शपथ घेते, सत्ता भोगते आहे परंतु अंमलबजावणीसाठी पुढाकार घेत नाही. भारतीय संविधान कोणत्याही विशिष्ट धमार्ला अधिकृत मानत नाही आणि सर्व धर्मांना समान वागणूक देते. पुढे बोलताना पाटील म्हणाले, ह्वसंविधान देशाच्या प्रशासनासाठी एक मजबूत आधार आहे आणि सरकारच्या शक्ती आणि नागरिकांच्या अधिकारांमध्ये संतुलन ठेवते. संविधानाने नागरिकांना समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाचे अधिकार प्रदान केले आहेत. प्रास्ताविकामध्ये बोलताना प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे म्हणाले,ह्व सिद्धार्थ बुद्ध विहार हे पूर्व भागातील परिवर्तनवादी विचाराचे प्रमुख केंद्र बनत आहे. वैचारिक कार्यक्रम नेहमीच समाजाला दिशा देत असतात. संविधान दिवस हा भारतीय लोकशाहीच्या पायाभरणीचा उत्सव आहे. हा दिवस नागरिकांना त्यांच्या संविधानिक अधिकारांची आणि कर्तव्यांची आठवण करून देतो. संविधानाने भारताला समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकतांत्रिक गणराज्य म्हणून घोषित केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि सविधान उद्देश पत्रिकेचे वाचन प्रा. डॉ. मा.ना. गायकवाड यांनी केले तर आभार ॲड. रोहित सोमवंशी यांनी मांनले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिव प्रकाश कांबळे, मिलिंद धावारे, उदय सोनवणे, करण ओव्हाळ सर्व संचालक मंडळ, सोसायटीतील, विविध नगरातील, परिसरातील महिला भगिनी, नागरिक यांनी प्रयत्न केले.

## उद्याचे जग एआयवर नव्हे ज्ञानोबा-तुकोबांच्या मंत्रावर चालेल

### विश्वास पाटील यांचे विचारः ३० व्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचा समारोप समारंभ




पुणेः सध्याचे जग हे एआयचे बनत आहे. एआय तंत्रज्ञानाला मयार्दा आहेत. मानवी बुद्धिमत्ता महत्वाची असून उद्याचे जग हे एआय च्या तंत्रावर नव्हे ज्ञानोबा - तुकोबांच्या मंत्रावर चालेल.ह्व असे विचार ज्येष्ठ लेखक आणि ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष विश्वास पाटील यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ३० व्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेच्या समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी एमकेसीएलचे वरिष्ठ सल्लागार व शास्त्रज्ञ डॉ. विवेक सावंत हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड, कुलगुरू डॉ. रविकुमार चिटणीस, प्र. कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, अधिष्ठाता डॉ. मिलिंद पात्रे हे यावेळी उपस्थित होते.

यावेळी विश्वशांतीच्या जीवन कायासाठी उपस्थित सर्वांच्या वतीने डॉ. विश्वनाथ कराड यांचा विशेष सत्कार करण्यात आला. योगगुरू अनंत कोंडे व मारूती पाडेकर गुरूजी यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच पीस स्टडीज च्या वतीने ह्यसेंटर फॉर एक्सेलेन्स इन संस्कृत अँड आयआरएस स्टडीज कोर्सच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

विश्वास पाटील म्हणाले, ह्व शिवाजी महाराजांना जिजाऊंनी विश्वशांतीची प्रेरणा दिली. त्यांच्यावर संतांच्या विचारांचा प्रभाव होता. शक्ती, युक्ती आणि भक्तीचा संगमातून स्वराज्य निर्माण केले. हिंदवी स्वराज्यातून मानवी जातीचे कल्याण केले. म्हणून शिवाजी महाराज सर्वश्रेष्ठ राजे झाले.ह्व

डॉ. विवेक सावंत म्हणाले, ह्व विज्ञान आणि अध्यात्म यांच्यामधील अद्वैत कल्पना ही आपली संतपरंपरा आहे. ती पुढे नेण्याचे काम डॉ. कराड सरांनी केले.आज बहुविद्याशाखीय शिक्षण व्यवस्थेची गरज असून त्यातूनच भारत आत्मनिर्भर होईल. विद्यार्थ्यांना स्व चा शोध घ्यायला शिकवा. स्व च्या शोधाच्या साधनेतून विश्वशांती प्राप्त होईल. प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, ह्व भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्वज्ञानाचा संदेश जगभर पसरविण्यासाठी या व्याख्यानमाला महत्वपूर्ण आहेत. ज्ञानोबा तुकोबा टाळकुट्यांचा विषय नाही, हे एक चांगले जीवन जगण्याचे सारं आहे. माणूस म्हणून समृद्ध होण्यासाठी संतांचाच एकमेव मार्ग आहे. डॉ.आर. एम. चिटणीस यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. मिलिंद पात्रे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मिलिंद पांडे यांनी आभार मानले.

## लातूर जिल्हा इंजिनियर असोसिएशनची नवी कार्यकारिणी जाहीर

लातूर : लातूर जिल्हा इंजिनियर असोसिएशन (एसीईए) ची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून नव्या पदाधिका-यांनी शहराच्या विकासात अभियंत्यांची भूमिका अधिक प्रभावीपणे बजावण्याचे आश्वासन दिले आहे. अभियंता म्हणून समाजाशी, नागरिकांशी आणि स्थानिक प्रशासनाशी सुसंवाद ठेवत दजेर्दार व पारदर्शक कामे करण्याची बांधिलकी नव्या कार्यकारिणीने व्यक्त केली.

असोसिएशनच्या बैठकीत सवार्नुमते कार्यकारिणीची रचना करण्यात आली. नव्या कार्यकारिणीत अध्यक्ष मनोज देशमुख, उपाध्यक्ष संतोष नाशिककर, सचिव वसीम शेख, सहसचिव अरुण पंचगल्ले, कोषाध्यक्ष अमोल सेलूकर, सहकोषाध्यक्ष ऋषिकेश निगडीकर यांच्यासह रिझवान गडीवाले, संदीप उच्चेकर, सिद्धलिंग सोरडे, विठ्ठल भोसले, दिनेश सरवडीकर यांची कार्यकारिणी विशेष सदस्य म्हणून निवड करण्यात आली. नवीन टीममध्ये अनुभवी तसेच तरुण अभियंत्यांचा समतोल साधण्यात आला असून अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध शाखांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित केले आहे.निवडीनंतर बोलताना नूतन पदाधिका-यांनी सांगितले की, लातूर शहराच्या विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी अभियंत्यांची जबाबदारी महत्त्वाची आहे. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, बांधकाम गुणवत्ता, सार्वजनिक प्रकल्प, तांत्रिक सल्ला, आपत्ती व्यवस्थापन, सुरक्षा नियमांचे पालन अशा अनेक क्षेत्रांमध्ये अभियंते थेट भूमिका बजावतात. त्यामुळे नागरिकांसाठी सर्वोत्तम अभियांत्रिकी सेवा उपलब्ध व्हाव्यात, ही आमची प्राथमिकता असेल.यावेळी पदाधिका-्यांनी शहरातील वाढत्या नागरी मागण्यांचा अभ्यास, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि टिकाऊ प्रकल्पांना प्राधान्य, नागरिकांसाठी अभियांत्रिकी मार्गदर्शन केंद्र उभारण्याचा विचार, तरुण अभियंत्यांसाठी कौशल्यवर्धन कार्यशाळा, मानक दर्जानुसार कामांची पडताळणी आणि जनजागृती, पर्यावरणपूरक बांधकामांसाठी प्रोत्साहन याबाबत काम करण्यासंदर्भात बैठकीत चर्चा केली.अभियंता असोसिएशन ही केवळ तांत्रिक संस्था नसून सामाजिक जबाबदारी पार पाडणारा घटक होत आहे, असेही पदाधिका-्यांनी नमूद केले.

## विद्यार्थ्यांनी वकिलीक्षेत्राबरोबरच न्यायदानाच्या क्षेत्रात यावेः न्यायमूर्ती मंगेश पाटील




लातूर : दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथे २९ नोव्हेंबर २०२५ रोजी उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती मंगेश एस. पाटील, अध्यक्ष–महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई–यांच्या प्रमुख उपस्थितीत संवादात्मक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. न्यायाधीश म्हणून काम करताना शिस्त आणि प्रामाणिकता हे अत्यंत महत्त्वाचे गुण आहेत असे त्यांनी सांगितले. तरुण विद्यार्थ्यानी वकिली क्षेत्राबरोबरच न्यायपालिकेमध्ये न्यायाधीश म्हणून कार्य करण्यासाठी खूप संधी आहे असे मत त्यांनी मांडले. ते पुढे म्हणाले की प्रत्येक काम केवळ मन लावून नव्हे, तर आनंदाने केले पाहिजे.न्यायालयातील प्रलंबित खटल्यांवर देखील त्यांनी अत्यंत वास्तववादी मत मांडले, खटल्यांची संख्या वाढणे हे समाजातील वाढती लोकसंख्या आणि त्याच्यामुळे होणारी गुंतागुंत याचा परिणाम आहेत. प्रत्येक प्रकरणाला २ड्ढ३ वर्षांचा नैसर्गिक वेळ लागतो, त्यामुळे या वास्तवाची जाण ठेवूनच प्रलंबन मोजले पाहिजे. न्यायाधीश आणि वकील या दोघांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास प्रलंबन कमी करण्यास मोठी मदत होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.आशिषजी बाजपाई व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ पूनम नाथानी उपस्थित होते.

न्यायमूर्ती पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यावसायिक सल्ले देखील दिले ते म्हणाले की कायद्याचा अभ्यास करताना फक्त पाठांतर न करता त्यामागील व्यवहारातील अर्थ समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. वकिलीच्या सुरुवातीची काही वर्षे आर्थिकदृष्ट्या कठीण जाऊ शकतात, पण हाच काळ सर्वात महत्त्वाचा असतो या काळात जितके निरीक्षण, वाचन, कोटार्तील वास्तविक व्यवहार समजून घेतला जाईल तितके भविष्यातील करिअर भक्कम होते. चांगली, स्वच्छ आणि संयमित भाषा ही वकिलाचे मोठे सामर्थ्य आहे, हे त्यांनी विशेष अधोरेखित केले. मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी एखादा छंद ठेवणे गरजेचे आहे असे देखील ते म्हणाले. विद्यार्थ्यांना वाचण्याची प्रेरणा देत भाषेचे सौंदर्य, तर्कशक्ती आणि न्यायलेखनाची शैली यांचा अभ्यास करावा, असे त्यांनी आवाहन केले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.अतिश तिवारी

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.